# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

वाचा :- १. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग,क्र.अकंपा-१२१७/प्र.क्र.१०२/का-८, दि. २१/०९/२०१७.
२. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग,क्र.अकंपा-१२२१/प्र.क्र.११२/का-८, दि. २७/०९/२०२१.

## परिपत्रक

जा.क्र.बीएमसी/अनुकंपा/२०२१/1748 दिनांक :- २७ ऑक्टोंबर, २०२१.

विद्यापीठातील सर्व संबंधित विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख/योजना प्रमुखांना कळविण्यात येते की, शासकीय सेवेत असतांना कर्मचा-याचे निधन झाल्यास त्यांच्या कुटूंबावर ओढवणा-या आर्थिक आपत्तीतून कुटूंबास बाहेर काढण्यासाठी आणि या आपत्तीजनक परिस्थितीवर मात करण्यास मदत करण्यासाठी तसेच संबंधित मृत कर्मचा-याचे कुटूंब उघडयावर पडु नये यासाठी कुटूंबातील एका पात्र सदस्यास शासकीय सेवेत एक विशेष सवलत म्हणुन अनुकंपा (सहानुभूती) नियुक्ती देण्याच्या तत्कालीन प्रचलित योजनेत सुधारणा करून सुधारित योजना दिनांक २६ ऑक्टोंबर, १९९४ च्या शासन निर्णयानुसार लागु करण्यात आली आहे.

त्यानुसार संदर्भ क्र. ०१ वरील शासन निर्णयाव्दारे अनुकंपा नियुक्ती धोरणातील सर्व तरतुदींचे एकत्रिकरण करून प्रचलित अनुकंपा नियुक्ती धोरणानुसार गट-क व गट-ड मधील राज्य शासकीय कर्मचा-यांचे सेवेत असतांना निधन झाल्यास त्याच्या कुटूंबातील पात्र सदस्यास गट-क व गट-ड मधील पदावर आजपर्यंत अनुकंपा तत्वावर शासकीय सेवेत नियुक्ती देण्यात येत आहेत.

उपरोक्त प्रयोजन व कोविडची पार्श्वभुमीचा विचार करून गट-क व गट-ड मधील राज्य शासकीय कर्मचा-यांप्रमाणे गट-अ व गट-ब मधील राज्य शासकीय कर्मचा-यांना देखील ही योजना लागु करण्याची बाब शासन स्तरावर विचाराधीन होती.

त्याअनुषंगाने शासन निर्णय संदर्भ क्र. ०२ नुसार गट-क व गट-ड मधील शासकीय कर्मचा-यांप्रमाणे अनुकंपा तत्वावर नियुक्तीचे धोरण गट-अ आणि गट-ब मधील शासकीय कर्मचा-यांना लागु करण्यात आले आहे. त्यानुसार शासकीय सेवेत असतांना गट-अ व गट-ब मधील दिवंगत झालेल्या कर्मचा-यांच्या कुटूंबातील पात्र सदस्यास गट-क व गट-ड मध्ये अनुकंपा नियुक्ती अनुज्ञये करण्यात आला आहे. कोविडच्या पार्श्वभुमीवर सदर योजनेचा लाभ हा दिनांक ०१ जानेवारी, २०२० पासुन अनुज्ञेय करण्यात आला आहे. सदरहु कालावधीमध्ये गट-अ व गट-ब मधील जे अधिकारी/कर्मचारी दिवंगत झाले आहेत त्या अधिकारी/कर्मचा-यांचे कुटूंबातील एका पात्र सदस्यास अनुकंपा नियुक्ती मिळणेकरीता अर्ज सादर करणेबाबत कार्यालयामार्फत अवगत करण्यात यावे.

तसेच विद्यापीठातील ब-याच विभागांमध्ये दिवंगत झालेल्या अधिकारी/कर्मचा-यांचे कुटूंबास अनुकंपा नियुक्तीकरीता अर्ज करणेबाबत योग्य मार्गदर्शन करण्यात येत नसल्याचे निदर्शनास आले आहे. तेव्हा सर्व संबंधित विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख/योजना प्रमुखांना सुचित करण्यात येते की, अनुकंपा नियुक्तीचे धोरणांबाबत शासन निर्णयातील तरतुदी दिवंगत अधिकारी/कर्मचा-यांचे कुटूंबास १५ दिवसाचे आत अवगत करण्याची सर्वस्वी जबाबदारी विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख/योजना प्रमुखांची राहील याची नोंद घ्यावी.

मा. कुलगुरू यांच्या मंजुरी व आदेशान्वये.

कुलसचिव,<br>
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला.

प्रतिलीपी :-